# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 05 April 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०५ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली, राज्यातल्या आठ मतदारसंघात एकूण ४७७ अर्ज दाखल
- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बीड लोकसभा मतदारसंघातून बजरंग सोनवणे यांना, तर धाराशिव इथून अजित पवार गटाची अर्चना पाटील यांना उमेदवारी जाहीर
- आय आय टी मुंबईत कर्करोग रुग्णांसाठी सी ए आर - टी सेल उपचार पद्धतीचं राष्ट्रपतींच्या हस्ते लोकार्पण

आणि

- नांदेडमध्ये ड्रेनेज चेंबर दुरुस्तीचं काम करताना तीन जणांचा गुदमरून मृत्यू

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. यामध्ये राज्यातल्या आठ मतदरासंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात एकूण ३५२ उमेदवारांचे ४७७ अर्ज दाखल झाले आहेत. हिंगोलीत ७८, नांदेड - ९२ आणि परभणी - ६५, बुलढाणा - ४२, अकोला -४०, अमरावती - ७३, वर्धा - ३८, आणि यवतमाळ- वाशिम मतदारसंघात ४९ अर्ज दाखल झाले आहेत. आज अर्जांची छाननी होणार असून, आठ तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे.

****

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालच्या शेवटच्या दिवशी नांदेड मतदारसंघात ७२ अर्ज दाखल झाले. नांदेडमध्ये भाजप उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी काल अर्ज भरला. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यावेळी उपस्थित होते. वंजित बहुजन आघाडीचे उमेदवार अविनाश भोसीकर यांनीही काल अर्ज दाखल केला.

हिंगोली इथं महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत अर्ज भरला. यापूर्वी पक्षानं इथून विद्यमान खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या नाराजीनंतर उमेदवार बदलण्यात आला.

परभणी लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीनं बाळासाहेब उगले यांच्याऐवजी पंजाबराव डख यांना उमेदवारी दिली असून, त्यांनी काल अर्ज दाखल केला.

अकोला इथून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काल अर्ज दाखल केला.

अमरावतीमध्ये भाजपा उमेदवार नवनीत राणा यांनी काल अर्ज भरला. तत्पूर्वी त्यांनी घेतलेल्या जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

बुलडाणा लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महाविकास आघाडीचे उमेदवार नरेंद्र खेडेकर यांनी काल अर्ज दाखल केला. आमदार आदित्य ठाकरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यावेळी उपस्थित होते.

यवतमाळ इथं शिवसेनेच्या महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेला संबोधित केलं.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं काल दोन उमेदवारांची घोषणा केली. बीड लोकसभा मतदारसंघातून बजरंग सोनवणे यांना, तर भिवंडी इथून सुरेश म्हात्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

****

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसनं अर्चना पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी काल मुंबईत

वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. तत्पूर्वी अर्चना पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्या आमदार राणा जगजीत सिंह पाटील यांच्या पत्नी आहेत.

✼✼✼✼

उत्तर – पश्चिम मुंबई मतदार संघातून निवडणूक लढवणार असल्याचं संजय निरुपम यांनी काल जाहीर केलं. पक्षविरोधी वक्तव्यं आणि शिस्तभंगांच्या तक्रारीनंतर काँग्रेसनं त्यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे.

✼✼✼✼

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवलं आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राणा यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने आठ जून २०२१ रोजी त्यांचं जात प्रमाणपत्र रद्द केलं होतं, तसंच दोन लाख रुपये दंड देखील ठोठावला होता. त्या निर्णयाला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

✼✼✼✼

कर्करोग रुग्णांसाठी सी ए आर – टी सेल उपचार पद्धतीमुळे सर्व मानव जातीसाठी आशेचा नवा किरण निर्माण झाल्याचं, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. आय आय टी मुंबईत काल सी ए आर – टी सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण केल्यानंतर त्या बोलत होत्या. पूर्णपणे भारतीय बनावटीच्या या उपचार पद्धतीमुळे अनेकांचे प्राण वाचणार आहेत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या उपचार पद्धतीमुळे भारताला प्रगत वैद्यकीय सेवा देणाऱ्या देशांच्या यादीत स्थान मिळालं असल्याची भावना राष्ट्रपतींनी व्यक्त केली. राज्यपाल रमेश बैस यावेळी उपस्थिती होते.

✼✼✼✼

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी प्रशासनाची जय्यत तयारी सुरु आहे. काल औरंगाबाद मध्य आणि औरंगाबाद पूर्व या दोन विधानसभा क्षेत्रातल्या मतदान केंद्राध्यक्ष आणि सहाय्यक मतदान अधिकारी अशा एक हजार ७५६ कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतलं. या प्रशिक्षणाला ५७० कर्मचारी गैरहजर होते. या सर्व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

✼✼✼✼

दरम्यान, मतदार जनजागृतीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जिल्हाधिकार्यांच्या संकल्पनेतून येत्या गुढी पाडव्याच्या दिवशी 'गुढी पाडवा, मतदान वाढवा,' हा

उपक्रम राबवण्यात येणार आहे. याअंतर्गत नऊ तारखेला सकाळी नऊ ते १० वाजेदरम्यान एकाच वेळी संपूर्ण जिल्हाभरात कार्यक्रमाचं आयोजन करुन मतदार जनजागृती करण्यात येणार असून, गावकऱ्यांकडून मतदान करण्यासंदर्भात शपथ घेतली जाणार आहे.

****

हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निरीक्षक एम. एस. अर्चना यांनी काल लिंबाळा मक्ता इथल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात असलेल्या स्ट्राँगरूमची पाहणी करुन आढावा घेतला. तसंच मतमोजणी वेळी माध्यम कक्ष स्थापन करण्यात येणार असलेल्या जागेचीही त्यांनी पाहणी केली.

****

नांदेडमध्ये ड्रेनेज चेंबर दुरुस्तीचं काम करत असताना दोन मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला. काल सकाळच्या सुमारास ही घटना घडली असून, या मजुरांना वाचवण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीचाही यावेळी मृत्यू झाला. नांदेड महानगरपालिकेअंतर्गत केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत माळटेकडी मलउपसा केंद्रात ही घटना घडली.

****

ख्यातनाम गायक आणि संगीतकार पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या पत्नी आणि प्रसिद्ध गायक पंडित शौनक अभिषेकी यांच्या मातोश्री विद्या अभिषेकी यांचं काल पुण्यात वृद्धापकाळाने निधन झालं, त्या ८३ वर्षांच्या होत्या. अभिषेकी बुवांच्या संगीतकार्याला मोलाची साथ देत विद्याताईंनी त्यांच्या गुरुकुलाची सर्व जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

****

मराठवाड्यातले पहिले प्लास्टिक सर्जन दिवंगत डॉ. अविनाश येळीकर यांच्या पहिल्या स्मृतीदिनानिमित्त छत्रपती संभाजीनगरमध्ये येत्या रविवारी त्यांच्यावरील गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात येणार आहे. एम जी एम च्या रुक्मिणी सभागृहामध्ये सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम होईल. प्रसिद्ध सर्जन डॉ. रविन थत्ते यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होणार असून एमजीएम संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर कदम या कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील.

****

लातूर इथं काल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतीराव फुले जयंती, श्रीराम नवमी आणि रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी शांतता समितीची बैठक घेतली. सर्वधर्मीय बांधवांनी एकमेकांच्या भावनांचा आदर करत हे जयंती, सण साजरे करावेत, या काळात सामाजिक सलोखा, शांतता कायम राखून लातूर जिल्ह्याची परंपरा जोपासावी, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. या बैठकीत उपस्थितांना मतदार जागृतीची शपथ देण्यात आली.

****

जालना शहरातल्या बहुचर्चित गजानन तौर हत्या प्रकरणातला मुख्य संशयित विलास पवार उर्फ टायगर शेरा याला जालना पोलिसांनी पंजाबमधल्या अमृतसरमधून अटक केली. त्याला काल न्यायालयासमोर हजर केलं असता, आठ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिली. ११ डिसेंबर २०२३ रोजी गजानन तौर याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणात सहभागी इतर तीन संशयित आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

****

पैठण – पंढरपूर पालखी राष्ट्रीय महामार्ग लवकर पूर्ण करण्याची मागणी करणारी याचिका औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती आर व्ही घुगे आणि न्यायमूर्ती आर एम जोशी यांनी, केंद्र शासनासह सर्व प्रतिवादींना नोटीसा बजावण्याचे आदेश दिले आहेत. या याचिकेवर पुढील सुनावणी दोन मे रोजी होणार आहे.

****

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर, अवैध वाळु वाहतूक प्रकरणी आणि मद्य साठ्याबाबत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सहा ठिकाणी धाडी टाकत कारवाई करण्यात आली. जिल्ह्यात सिल्लोड ग्रामीण आणि शहर, बिडकीन, खुलताबाद, पैठण अशा सहा ठिकाणी कारवाई करत अकरा लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****

हवामान

राज्यात काल वर्धा इथं सर्वाधिक ४२ पूर्णांक पाच अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. धाराशिव ४१ अंश सेल्सिअस, बीड ४० पूर्णांक पाच, लातूर ४० तर छत्रपती संभाजीनगर इथं ३९ पूर्णांक पांच अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं.
उद्या शनिवार आणि परवा रविवारी लातूर, बीड, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

****